ePaper

| वर्ष - 7 । अंक -59 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 27 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पवार-फडणवीस शाब्दिक चकमक; ओबीसींचा मुद्दा




**आतील पानांत**

- अन् पुणे महापालिकेला आली जाग!
- सोसायटीधारकांच्या समस्यांसाठी महापालिका प्रशासनाचा 'मास्टर प्लॅन'!


# काऊंटडाऊन सुरू!

## विविध कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी उरले फक्त शेवटचे 5 दिवस...

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ता धारकांसाठी 30 जूनपर्यंत विविध कर सवलती आहेत. या कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी शेवटचे 5 दिवस बाकी असून नागरिकांनी कर सवलतींचा लाभ घेऊन आपला चालू आर्थिक वर्षातील आणि थकीत कर भरावा, असे आवाहन कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच थकबाकीदारांनी कर न भरल्यास 1 जुलैपासून मालमत्ता जप्तीचा धडाका सुरू करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांसाठी 30 जूनपर्यंत संपूर्ण कराचा भरणा केल्यास किमान दहा टक्के व कमाल 20 टक्के सवलत मिळत आहे. त्यानुसार आत्तापर्यंत 2 लाख 52 हजार 296 मालमत्ता धारकांनी आपल्या कराचा भरणा करून विविध कर सवलतींचा लाभ घेतला आहे. महापालिका तिजोरीत तब्बल 334 कोटी रुपये जमा झाले आहेत. शहरातील 31 मार्च 2023 अखेर 50 हजारापेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्या 39 हजार 655 मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडे तब्बल साडेसहाशे कोटी रुपयांचा कर थकीत होता. हा कर वसूल करण्यासाठी विभागाच्या वतीने एसएमएस, कॉलिंग, रिक्षाव्दारे जनजागृती, होर्डिंग आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे.

### 4 हजार 122 थकबाकीदारांनी भरला कर

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जनजागृतीचा परिणाम म्हणून जप्ती पात्र मालमत्तापैकी 1598 लोकांनी 11 कोटीचा अंशतः भरणा केला तर 2524 लोकांनी 27 कोटीचा पूर्ण भरणा केला आहे. 39138 थकबाकीदारांपैकी 4 हजार 122 नागरिकांनी म्हणजेच जवळपास 10 टक्क्यांवर लोकांनी आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

### असा जमा झाला कर...

| | |
|---|---|
| ऑनलाईन – | 231 कोटी 8 लाख |
| विविध ॲप – | 3 कोटी 79 लाख |
| रोख. – | 42 कोटी 53 लाख |
| धनादेशाद्वारे– | 27 कोटी 97 लाख |
| इडीसी - | 3 कोटी 52 लाख |
| आरटीजीएस– | 10 कोटी 44 लाख |



" 1 जुलैपासून जप्तीचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. जप्तीसाठी एम एस एफ जवान उपलब्ध करून देण्यात आले आहेत. दोन ते तीन झोन मिळून एक जप्ती पथक तयार केलेले आहे. येत्या तीन महिन्यात सर्व जप्तीपात्र मालमत्तांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. नागरिकांनी 30 जून अखेर आपल्या कराचा भरणा करून पालिकेला सहकार्य करावे.

**– शेखर सिंह,**
आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका



" विहित मुदतीत कर न भरल्यास कायद्यातील तरतुदीनुसार महिना 2 टक्के विलंब शुल्क आकारण्यात येते. हे विलंब शुल्क कायद्यातील तरतुदीनुसारच प्रत्येक दिवशी वाढत राहते. त्यामुळे करांची थकबाकी ठेवणे हे अंतिमतः मालमत्ता धारकांसाठी आर्थिक नुकसानीचे आहे आणि हे जप्तीच्या कटू कारवाईपेक्षा अधिक वाईट आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी याचा विचार करून आपला थकीत कर भरलेला केंव्हाही चांगला.

**– नीलेश देशमुख,** सहायक आयुक्त

# वयाच्या पंचवीशीपर्यंत वाहन परवाना मिळणार नाही

## अल्पवयीन मुलांच्या हाती वाहन देणे आता पडणार महागात..

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अल्पवयीन मुलांच्या हाती वाहन देणे आता पालकांना महागात पडणार आहे. अल्पवयीन मुलगा अथवा मुलगी गाडी चालविताना आढळल्यास त्यांच्या पालकांना २५ हजार रूपये दंड केला जाणार आहे. याचबरोबर अशा अल्पवयीन मुलांना २५ वर्षे पूर्ण होईपर्यंत वाहन चालविण्याचा परवानाही मिळणार नाही.**

याबाबतचे आदेश परिवहन आयुक्त विवेक भीमनवर यांनी राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांना (आरटीओ) दिले आहेत. परिवहन आयुक्तांनी सर्व आरटीओंना पाठविलेल्या परिपत्रकात म्हटले आहे की, १८ वर्षांखालील मुलगा अथवा मुलीस सार्वजनिक ठिकाणी वाहन चालविण्यास परवानगी नाही. याला केवळ ५० सीसीपेक्षा कमी इंजिन क्षमतेच्या दुचाकींचा अपवाद आहे.

या दुचाकी १६ वर्षांवरील सर्वांना चालविण्यास परवानगी आहे. अल्पवयीन मुलांनी वाहने चालवू नयेत,



यासाठी कारवाईच्या सूचना परिवहन विभागाकडून सातत्याने केल्या जात आहेत. त्याचे पालन होत नसल्याचे दिसून आले आहे.

यामुळे यापुढे या नियमांचे पालन काटेकोरपणे करावे. सर्व आरटीओंनी अल्पवयीन वाहन चालविणाऱ्या अल्पवयीन मुलांवर कारवाईची मोहीम हाती घ्यावी. राज्यातील अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. एकूण अपघातांमध्ये दुचाकी अपघातांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

# अन् पुणे महापालिकेला आली जाग!

## » रूपाली चाकणकर : हिरकणी कक्ष अखेर वर्षभराच्या पाठपुराव्यानंतर कार्यान्वित

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका मुख्य इमारतीमधील महिला कर्मचारी तसेच महापालिकेत कामानिमित्त येणाऱ्या महिलांसाठी मोठा गाजावाजा करून उभारण्यात आलेला हिरकणी कक्ष अखेर वर्षभराच्या पाठपुराव्यानंतर कार्यान्वित करण्यात आला. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी हा कक्ष सुरू आहे की नाही, याची पाहणी करण्यासाठी येत असल्याचे कळविल्यानंतर तातडीने चक्रे फिरली आणि मुख्य इमारतीतील तळमजल्यावर तो सुरू करण्यात आला. मात्र यानिमित्ताने महापालिका महिलांच्या प्रश्नासंदर्भात किती असंवेदनशील आहे, हे स्पष्ट झाले.**



महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये कार्यरत असलेल्या महिला कर्मचारी आणि कामानिमित्त महापालिका भवनात येणाऱ्या महिलांसाठी सन २०१६ मध्ये मोठा गाजावाजा करून हिरकणी कक्ष उभारण्यात आला. या कक्षात स्तनदा मातांसाठी बालकांना दूध पाजण्याची व्यवस्था करण्यात आली होती. त्यासाठी महापालिकेच्या मुख्य इमारतीतील तळमजल्यावर हा कक्ष उभारण्यात आला होता.

मात्र वर्षभरापूर्वी हिरकणी कक्ष काढून तेथे दिव्यांग कक्ष सुरू करण्यात आला होता. हिरकणी कक्षासाठी कागदोपत्री तिसऱ्या मजल्यावरील काका वडके सभागृहाशेजारील खोलीत जागा देण्यात आली होती. मात्र ही जागा मालमत्ता विभागाच्या ताब्यात होती आणि त्यांनी हिरकणी कक्षासाठी जागेचा ताबा दिलेला नव्हता.

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनावेळी विधिमंडळातील हिरकणी कक्षाचा मुद्दा पुढे आल्यानंतर सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी महापालिकेतील हिरकणी कक्षाची वस्तुस्थिती पुढे आणली होती. त्यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्याकडे तक्रार केली होती. मात्र महापालिका प्रशासनाकडून त्यासंदर्भात कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने विवेक वेलणकर यांनी राज्य महिला आयोगाकडे तक्रार नोंदविली होती.

### अन् अखेर हिरकणी कक्ष सुरू

»राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी त्याची दखल घेत हिरकणी कक्ष तातडीने सुरू करण्याचा आदेश पत्राद्वारे महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांना दिला होता. मात्र प्रशासनाकडून या आदेशालाही वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. त्यामुळे वेलणकर यांनी पुन्हा राज्य महिला आयोगाकडे तक्रार केली. त्यानुसार आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी हिरकणी कक्षाची पाहणी करण्यासाठी येत असल्याचे महापालिकेला कळविले. त्यानंतर प्रशासकीय पातळीवरील सूत्रे तातडीने हालली आणि तळमजल्यावर रुपाली चाकणकर यांच्या उपस्थितीत हिरकणी कक्ष सुरू करण्यात आला.

---

# दुमजली इमारतीचा स्लॅब कोसळून मोठी दुर्घटना!

## » एका व्यक्तीचा मृत्यू, एक गंभीर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कॅम्प परिसरात एका दुमजली इमारतीचा स्लॅब कोसाळून एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना रात्री ८:३०च्या सुमारास घडली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झालं आहे. मिळालेल्या फोटोच्या आधारे ही दुमजली इमारत पडण्याच्या स्थितीत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. पुण्यात दोन दिवस मोठा पाऊस झाल्याने स्लॅब कमकुवत होऊन पडला असावा, अशी शक्यता अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे.**



या घटनेत स्टॅनली डिसोझा (वय ५० ) यांचा मृत्यू झाल्याचं कळत आहे. तर जेरी डिसोझा (वय ६०) ह्या गंभीर रित्या जखमी झाल्याची माहिती प्राप्त होत आहे. जेरी डिसोझा यांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे आणि त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातल्या कॅम्प परिसरात दस्तुर मेहेर रोड येथे एक ५० ते ६० वर्षे जुन्या दुमजली इमारतीचा स्लॅब कोसळण्याची घटना घडली होती. अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्या ठिकाणी पाहणी केल्यानंतर घराचा स्लॅब कोसळला होता. घरात चार जण होते. यातल्या दोन जणांच्या अंगावर हा स्लॅब पडला होता. अग्निशमन दलाच्या जवानांनी जखमींना रुग्णवाहिकेद्वारे तातडीने रुग्णालयात पाठवले. मात्र यातल्या एका व्यक्तीचा दुर्दैवाने मृत्यू झाला होता. जखमीवर सध्या ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान काम करत आहे. ही इमारत अंदाजे ५० ते ६० वर्ष जुनी असल्याचं सांगण्यात येत आहे. त्यामुळे इमारत पडण्याच्या स्थितीत असल्याची शक्यता अग्निशमन दलाचे अधिकारी रोहित रणपिसे यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे महानगरपालिकाने तात्काळ दखल घेऊन इमारत दुरुस्त करावी किंवा जमीनदोस्त करावी, अशी सूचना अग्निशामक विभागाने पोलिसांना दिली आहे.

# बसण्यासाठी जागा नाही की पिण्यासाठी पाणी..

## » हवेली तहसील कार्यालयाची बिकट अवस्था

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराच्या मध्यवर्ती परिसरात असलेले आणि भौगोलिकदृष्ट्या सर्वांत मोठ्या हवेली तहसील कार्यालयासह दुय्यम निबंधकांचे (हवेली क्रमांक एक) कार्यालय नागरिकांसाठी 'असून अडचण आणि नसून खोळंबा' ठरले आहे. सहदुय्यम निबंधकांच्या कार्यालयात दररोज आठशे ते एक हजार नागरिक भेट देतात. राज्याच्या तिजोरीत दरमहा ७० कोटी रुपयांचा महसूल भरणाऱ्या या कार्यालयात नागरिकांसाठी ना बसायला जागा आहे ना पिण्यासाठी पाणी...**



शहरांतील सर्वच सहदुय्यम निबंधक कार्यालयांची थोड्याबहुत प्रमाणात सारखीच स्थिती आहे. 'हवेली क्रमांक एक' कार्यालयाची परिस्थिती भीषण आहे. सुमारे तीन गुंठे परिसरातील हे कार्यालय जुनाट वास्तूमध्ये आहे. २७०० चौरस फुटाच्या जागेत अधिकारी, कर्मचारी आणि दस्तनोंदविण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना बसावे लागते. याच कार्यालयासमोर अर्धवट अवस्थेतील टोलेजंग इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधली आहे. या इमारतीत हे कार्यालय स्थलांतर करणे आवश्यक आहे. मात्र इमारतीचे अर्धवट काम पूर्ण करून तेथे तहसील; तसेच दुय्यम निबंधक कार्यालयास जागा उपलब्ध करून देण्याची पुण्यातील; तसेच सरकारमधील लोकप्रतिनिधी, सनदी अधिकाऱ्यांची मानसिकता नाही.

या कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी; तसेच तेथे आलेल्या नागरिकांनी पायाभूत सुविधांबद्दल नाराजी व्यक्त केली. बसण्यासाठी समाधानकारक जागा नाही. दररोज येथे आठशे ते एक हजार नागरिक भेट देतात आणि सरासरी ४० दस्तांची नोंदणी होते. दरमहा कार्यालय सरासरी ७० कोटी रुपयांचा महसूल सरकारी तिजोरीत जमा करते. तरीही कार्यरत अधिकारी, कर्मचाऱ्यांना जेवण्याची व्यवस्थाही नाही आणि चांगले स्वच्छतागृहही नाही. असाच त्रास नागरिकांनाही सहन करावा लागतो.

# 'ट्रॅक कंपोनन्ट्स'च्या कामगारांना तब्बल साडेबारा हजारांची वेतनवाढ!

## आमदार महेश लांडगे यांची कंपनी-संघटनेत यशस्वी मध्यस्थी

### स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटनेचा वेतनवाढ करार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवड शहरातील नागरिकांनी ३० जूनपर्यंत मिळकतकर भरल्यास विविध सवलती महापालिकेने जाहीर केल्या आहेत. त्यांचा लाभ घेण्यासाठी अवघे पाच दिवस शिल्लक आहेत. थकबाकीसह चालू आर्थिक वर्षातील कर नागरिकांना भरता येणार आहे. एक जुलैपासून थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाई करण्याचा इशारा, कर संकलन व कर आकारणी विभागाने दिला आहे.**



पुणे आणि नाशिक येथील औद्योगिक वसाहतीतील ट्रॅक कंपोनन्ट्स लि.कंपनीच्या कामगारांना तब्बल १२ हजार ५०० रुपयांची पगारवाढ मिळाली आहे. स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना आणि कंपनी व्यवस्थापनामध्ये वेतनवाढ करार झाला. त्यामुळे कामगारांनी फटाके आणि गुलालाची उधळण करीत आंनदोत्सव साजरा केला.

आमदार महेश लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कंपनी व्यवस्थापन आणि कामगार संघटना यांच्यात वेतनवाढ करार झाला. संघटनेचे प्रमुख सल्लागार रोहिदास गाडे, संघटनेचे अध्यक्ष जीवन येळवंडे, जी.आर.आय. टॉवर इंडिया प्रा. लि. कोल्हापूर कंपनीचे डायरेक्ट रमेश म्हस्करंस, ट्रॅक कंपोनंन्ट्सचे सी.ई.ओ. राजेश खन्ना यांनी वेतनवाढ करारावर स्वाक्षरी केल्या.

यावेळी संघटनेचे सरचिटणीस कृष्णा रोहोकले, उपाध्यक्ष शाम सुळके, सहचिटणीस रघुनाथ मोरे, खजिनदार अमृत चौधरी, माथाडी कामगार नेते किसन बावकर, तेजश बीरदवडे, महिंद्रा लॉजीस्टिक युनिट अध्यक्ष प्रशांत पाडेकर, महादेव येळवंडे, रविंद्र भालेराव, यूनिट अध्यक्ष चेतन सूर्यवंशी, उपाध्यक्ष रुपेश ढाके, सरचिटणीस समीर शेख, सहचिटणीस शशिकांत माळी, खजिनदार राकेश गिराशे, चाकण यूनिट अध्यक्ष दिपक बऱ्हाटे, उपाध्यक्ष मिंन्टू कुमार, सरचिटणीस प्रवीण वाडेकर, सहचिटणीस अनिल कुंभार, खजिनदार सवाई सिंह, व्यवस्थापनाच्या वतीने कंपनीचे सी.इ.ओ. राजेश खन्ना, प्लांट हेड. महेंद्र पाटील, चाकण प्लांट हेड गिरीश भेंडगावे, एच आर मॅनेजर अविनाश चोरमाले, पर्चेस मॅनेजर स्वप्रिल मौले आदी उपस्थित होते.

पुजाताई थिगळे यांनी सूत्रसंचालन केले, व सरचिटणीस कृष्णा रोहोकले यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला. कामगारानी पेढे वाटून फटाक्याची अतिषबाजी करुण आनंद व्यक्त केला.

### वेतनवाढ करारातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे :

**कामगारांना एकूण १२ हजार रुपये प्रत्यक्ष पगार वाढ झाली. मेडिक्लेम पॉलीसी १ लाख रुपये संपूर्ण खर्च कंपनी करणार व जादाची ३०००००/- रुपयांची बफर पॉलीसी, मृत्यू साहाय्य योजना, ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी, एखाद्या कामगाराचा किंवा त्याच्या कुटुंबीयाला मोठ्या आजारामुळे जास्त खर्च आल्यास तर कंपनीने सर्वच्या सर्व खर्च म्हणजेच १००% रक्कम देण्याचे मान्य केले आहे. सुट्टी - A) PL - १५, B) SL - ०८, C) CL - ०८, D) PH - १० तसेच मतदानाची सुट्टी सरकारी आदेशानुसार राहील. मासिक हजेरी बक्षीस, कॅन्टीन सुविधा, दिवाळी बोनस १२ हजार ६०० रुपये. वैयक्तिक कर्ज सुविधा, प्रत्येक कामगाराला प्रत्येकी १५ महिन्याचा फरक देण्यात येणार आहे.**

---

# कामावर नसलेल्या कर्मचा-यांच्या नावाने काढले मानधन

## विभागीय चौकशी करण्याचा शेखर सिंह यांचा आदेश

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या नवीन जिजामाता रुग्णालयातील लिपिकाने पालिका सेवेत कार्यरत नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या नावे मानधनाची 16 लाख रुपयांची बीले काढल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. लिपिकाला पालिका सेवेतून निलंबित केले असून विभागीय चौकशी करण्याचा आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.**




### कार्यरत नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या नावाने बीले

**महापालिकेत कार्यरत नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या नावाने बीले काढली आहेत. सप्टेंबर 2020 ते मार्च 2023 या कालावधीत बोगस बिले काढून 16 लाख 10 हजार 929 रुपयांचा अपहार केला असून पालिकेची आर्थिक फसवणूक केली आहे. पारधी यांनी 16 लाखांचा अपहार केल्याचे लेखी स्वरूपात मान्य केले आहे.**

दत्तात्रेय विठ्ठल पारधी असे निलंबित केलेल्या लिपिकाचे नाव आहे. महापालिका वैद्यकीय विभागांतर्गत जिजामाता रुग्णालयात ते कार्यरत होते. रुग्णालयात कार्यरत गट 'अ' व 'ड' वर्गातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कामकाज, मानधनावरील कर्मचाऱ्यांचे मासिक बिल, सार्वजनिक सुट्यांचे बिल अशी जबाबदारी पारधी यांच्याकडे होती.

रुग्णालयाच्या जुलै 2020 च्या मानधन बिलांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी यांच्या लक्षात आले.

त्याबाबतची चौकशी करण्यात आली.त्यात पारधी यांनी कार्यरत नसलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नावे मानधनाची बिले काढल्याचे आढळले. मानधनाचे बील तयार करताना अधिकारी, कर्मचारी यांच्या संख्येत तफावत आहे.

# आयुक्तांकडून आकसातून कारवाई; उपायुक्त स्मिता झगडे यांचे स्पष्टीकरण

। पिंपरी । महाईन्यूज ।

अतिरिक्त आयुक्तांनी माझी रजा मंजूर केली होती. परदेशात गेल्यानंतर आयुक्तांनी रजा नामंजूर केल्याचे पत्र प्रशासनाने मला पाठवले. आयुक्तांनी आकसातून शासन सेवेत घेण्याबाबतचे पत्र पाठवल्याचे स्पष्टीकरण पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उपायुक्त स्मिता झगडे यांनी दिले.

उपायुक्त झगडे यांची अर्जित रजा मंजूर नसताना परस्पर परदेशात गेल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी शासनाला पाठविलेल्या पत्रात म्हटले होते. या बाबत उपायुक्त झगडे म्हणाल्या, माझ्याकडे असलेल्या नागरी सुविधा केंद्र या विभागाचे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप




आहेत. नियमानुसार मी त्यांच्याकडून रजा मंजूर करून घेतली होती. अतिरिक्त आयुक्तांना रजा मंजुरीचे अधिकार आहेत. रजा मंजुरीनंतर मी नातेवाईकांच्या लग्नासाठी परदेशात गेले होते. मात्र, परदेशात गेल्यानंतर आयुक्तांनी रजा नामंजूर केल्याचा ई-मेल मला प्रशासनाने पाठविला. तो मेल मी उशिराने बघितला. महापालिकेत मला उपायुक्त म्हणून तीन वर्ष पूर्ण झाले नसून शासनाला पाठविलेले पत्र चुकीचे असल्याचा दावा झगडे यांनी केला आहे.

# काही अनुत्तरित प्रश्न...



भूमिका
निलेश दुटाळ
+91-87668 40811



**विश्वाच्या पसाऱ्यात आपला जीव म्हणजे शक्तिशाली दुर्बिणीतून दिसणाऱ्या जंतूंपेक्षाही लहान आहे. शाळेत विज्ञानाचे गुरुजी प्रयोगशाळेत नेवून अनेक प्रयोग दाखवायचे ,एक दिवस त्यांनी घरून दही आणायला सांगितले , दोन पिरियड नंतर विज्ञानाच्या पिरियड मध्ये आम्ही प्रयोगशाळेत गेल्यावर गुरुजींनी मी आणलेले दही काही थेंब मायक्रोस्कोप खाली टाकले आणि मला बघायला सांगितले. त्या एक थेंब दह्यात शेकडो कृमी वळवळताना दिसले, त्यानंतर अनेक वर्ष दही माझ्या घशाखाली उतरत नव्हते. एवढ्या विराट जगात आपण हे दह्यातले जंतू सुद्धा नाही असे वाटते.**

आपल्या जागेवर आपण सगळेच तीसमारखा असतो परंतु जगाला त्याची पर्वा नसते. जगाचा व्यवहार स्वतःच्या मस्तीत सुरु असतो. आपण उगाच चिंतातुर बनून अनेक गोष्टींची काळजी करीत जीव जाळत असतो. बरं कितीही जीव जाळला तरी काही प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत ,कदाचित ती कुणाकडे नसतात.

मी साक्षर झालो तेव्हापासून वाचत आहे की आसाम मध्ये ब्रह्मपुत्रा नदीच्या पुराने हाहाकार माजवला,अनेकांचे जीव गेले,कोट्यवधींची हानी झाली. आता पन्नाशी ओलांडली तरी त्याच बातम्या वाचाव्या लागतात. दरवर्षी येणाऱ्या पुरातून होणारी हानी आपण आजवर का थांबवू शकलो नाही ? १९६० साली यशवंतराव चव्हाण यांनी राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतल्यावर त्यांनी वर्षभरात महाराष्ट्र टँकरमुक्त करण्याची घोषणा केल्याचे माझ्या वाचनात आल्यावर मला झटका बसला कारण त्यानंतर आलेल्या प्रत्येक मुख्यमंत्र्यांनी अशीच घोषणा केली आहे. आजच्या घडीला राज्यात ४४ हजार खेडी आहेत त्यापैकी ३०० गावात आजही टँकरने पाणीपुरवठा केला जातो. गेल्या ६३ वर्षात महाराष्ट्र टँकरमुक्त का झाला नाही ?टँकर माफियांची चवथी,पाचवी पिढी आता त्या धंद्याला लागली आहे मात्र आजार मुळात बरा का झाला नाही ?

१९७५ साली वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना यवतमाळ जिल्ह्यातील दौऱ्यात त्यांनी अनेक किमी पायी जाणारें विद्यार्थी पाहिले आणि सोबत असणाऱ्या काही गाड्यातून मुलांना लिफ्ट दिल्याचा किस्सा माझ्या वाचनात आला. आता परवाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सातारा जिल्ह्यातील आपल्या गावच्या दौऱ्यावर असताना सेम असाच प्रसंग घडला याचा अर्थ गेल्या ३० वर्षात विद्यार्थ्यांची पायपीट संपली नाही , ती कधी संपणार आहे ? १९९५ साली मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना पाठीवर ओझे घेऊन चाललेल्या विद्यार्थ्यांची दया आली होती , हे पाठीवरचे ओझे कमी करणार अशी घोषणा त्यांनी केली होती. त्यानंतरच्या प्रत्येक शिक्षण मंत्र्याने अशीच घोषणा दिली , पाठीवरचे ओझे अजूनही का कमी होत नाही ?

१९८० साली अब्दुल रहमान अंतुले हे राज्याचे मुख्यमंत्री होते , त्याच काळात नागपूर अधिवेशनात आदिवासी भागातील कुपोषणाचा प्रश्न आला त्याला उत्तर देताना त्यांनी येत्या पाच वर्षात महाराष्ट्र कुपोषणमुक्त करण्याची घोषणा केली होती.

त्यानंतर गेल्या चाळीस वर्षात किमान दोन लाखांवर आदिवासी मुलांच्या कुपोषणात बळी गेला , त्यासाठी आजवर अब्जावधी रुपयांच्या योजना राबवल्या गेल्या, तरीही आजवर महाराष्ट्र कुपोषणमुक्त का झाला नाही ?त्या काळाच्या तुलनेत कुपोषण कमी व्हायला हवे मात्र त्याच्या प्रमाणात वाढ झाली त्याची जबाबदारी आजवर कुणी का घेतली नाही ? आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्या खात्याचा मंत्री आदिवासी पाहिजे अशी मागणी झाल्यावर किमान १० आदिवासी मंत्री झाले ,हे आदिवासी नेते मुख्य प्रवाहात आले मात्र आदिवासी का आला नाही ?

१९६७ सालात तडफदार नेते यशवंतराव मोहिते राज्याचे परिवहन मंत्री झाल्यावर त्यांनी गाव तेथे एसटी अशी लोकप्रिय घोषणा केली त्याला आता ५३ वर्ष झाले, त्यानंतरच्या काळात झालेल्या प्रत्येक परिवहन मंत्र्याने अशीच घोषणा दिली तरीही अजूनही प्रत्येक गावात एसटी का पोहोचली नाही ?

खेड्यात दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या खटपटी करून कमी करण्याचा सपाटा सरकारने लावला आहे परंतु खऱ्या अर्थाने या दारिद्र्याचे समूळ निर्मूलन अजूनही का होऊ शकले नाही ? असे हजारो प्रश्न आहेत कदाचित ते गोळा केले तर भलेमोठे पुस्तक तयार होईल परंतु त्याची उत्तरे द्यायला कुणीही पुढे येणार नाही.

हे झाले राज्याचे,जिल्हा,तालुका आणि आपल्या गावांची सुद्धा वेगळी कथा नाही,सगळीकडे असेच सुरु आहे. पुढे पाठ अन मागे सपाट असा कार्यक्रम सुरु आहे. रांगेतल्या पुढच्याला धक्का देत प्रत्येकाला पुढे जायचे आहे,कुणाला मागचे चिंतन करण्याची फुरसद नाही. या सगळ्या प्रश्नांची उत्तरे आपल्यालाकोण देईल ? इथे कुणीही कुणाला बांधील नसतो कदाचित त्यालाच लोकशाही म्हणत असतील कोण जाणे ?

## संपादकीय »

### ऐतिहासिक भेटीचे फलित

***पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या यंदाच्या अमेरिका भेटीचे एक सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पंतप्रधान मोदींची ही पहिली 'स्टेट व्हिजिट' होती. .***

अमेरिकेला 'स्टेट व्हिजिट' (राष्ट्रीय पाहुणे) म्हणून जाणे हा मोठा बहुमान आहे आणि ज्या देशाशी अमेरिकेचे घनिष्ठ संबंध आहेत, जो अमेरिकेचा भागीदार आहे आणि ज्या देशाशी अमेरिका भविष्यात घनिष्ठ संबंध विकसित करणार आहे अशा देशांच्या पंतप्रधानांना किंवा अध्यक्षांनाच 'स्टेट व्हिजिट'साठी निमंत्रित केले जाते. असे देश अमेरिकेच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणाच्या केंद्रस्थानी असतात. भारताला हा बहुमान मिळण्यामागचे मुख्य कारण गेल्या नऊ वर्षांत भारताची झालेली प्रगती आणि भारताची वाढलेली जागतिक भूमिका हे आहे. सेमिकंडक्टरपासून जेट इंजिनपर्यंत नऊ महत्त्वपूर्ण करारांवर या भेटीत स्वाक्षऱ्या झाल्या. यातील काही करार संवेदनशील तंत्रज्ञान भारताला देण्याशी निगडित आहेत. मोदी यांच्या प्रत्येक अमेरिकाभेटीत अमेरिकन भांडवल व तंत्रज्ञान भारतात आणण्यावर भर असतो.

**संज्ञानात्मक चेताशास्त्रज्ञ ह्यूगो स्पायर्स यांच्या मते, मेंदूमधील एका विशिष्ट यंत्रणेमुळे हे लोक नेहमी उशिरा येतात, कारण तिथे जाण्यासाठी कमी वेळ लागेल, असा त्यांचा अंदाज असतो. मेंदूचा हिपोकॅम्पस हा भाग वेळेच्या काही पैलूंवर प्रक्रिया करतो.**

## पाटण्यातील 'प्रयोग'

भारतातले विरोधक निवडणुकांची चाहूल लागली की खडबडून जागे होतात, ऐक्याच्या आणाभाका घेतात, गळ्यात गळे घालतात आणि एकमेकांच्या विरोधात तोडलेले तारे विसरून हसरी सामूहिक छायाचित्रे काढून घेतात. पूर्वी काँग्रेस सत्तेवर असताना या शंभुमेळ्यात भारतीय जनता पक्षही असे. आता फक्त खेळगडी बदलले; खेळ जुनाच आहे. बिहारचे मुख्यमंत्री आणि विरोधकांचे सांप्रतचे तारणहार नितीशकुमार यांनी गुडघ्याला अदृश्य बाशिंग बांधले आहे; त्याला दोन दशके झाली. मात्र, 'सिंहासन' चित्रपटातील 'देवा, सत्यनारायणा, आम्हाला एक दिवस तरी मुख्यमंत्री कराच...' असे गुपचूप म्हणणाऱ्या मंत्र्याप्रमाणे 'एक दिवस या देशाचा पंतप्रधान होईनच...' असे मनातल्या मनात रोज म्हणणारे आणि त्यासाठी झुरणारे डझनभर नेते तेथे आहेत. या सांगोवांगीच्या कथा नाहीत. आणीबाणीनंतर सन १९७७ ते १९८०, त्यानंतर १९८९ ते १९९१ आणि पुढे १९९६ ते १९९९ अशा तीन खेपांमध्ये भारताने अल्पकाळ टिकलेले सात पंतप्रधान पाहिले. ही सगळी सरकारे का पडली? या शोचनीय इतिहासाची पुनरावृत्ती होणार नाही, याची कोणती शाश्वती पाटण्यात जमलेले हे टोलेजंग नेते जनतेला देत आहेत? 'विरोधकांचा नेता कोण?' या प्रश्नाला निर्वाचित खासदार नेता निवडतील, हे उत्तर तत्त्वत: योग्य आहे.



१९७७ च्या 'जनता क्रांती'तही कोणी एक सर्वमान्य नेता नव्हता. मात्र, आज नेता निवडला नसला तरी विरोधकांची ही आघाडी भविष्यात कायम राहील आणि तीत फाटाफूट होणार नाही, याची खात्री मतदारांना पटायला हवी. इतिहास ती हमी देत नाही.कोणतीही आघाडी टिकाऊ व्हायची असेल तर तिच्यात एक ध्रुव भक्कम लागतो. नरसिंह राव किंवा डॉ. मनमोहनसिंग यांची सरकारे, तसेच अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार सत्तेत असताना काँग्रेस व भाजप हे आघाडीतील सर्वांत प्रबळ पक्ष होते. आज काँग्रेसची अवस्था काय आहे? काँग्रेसमधून फुटून निघालेले तृणमूल, वायएसआर काँग्रेस, भारत राष्ट्र समिती, राष्ट्रवादी काँग्रेस आदी केवळ प्रादेशिक पक्ष आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राष्ट्रवादीने शेतकऱ्यांचे गळे दाबले!

## म्हणून NCPमधील नेते आमच्या पक्षात येत आहेत : भारत राष्ट्र समिती

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तेलंगणचे मुख्यमंत्री आपल्या मंत्रिमंडळासह सोलापुरात दाखल झाले आहेत. त्यांच्यासोबत जवळपास ६०० वाहनांचा ताफा आहे. पंढरपुरात ते विठ्ठल दर्शनासाठी आले आहेत. आता त्यांच्या या पंढरपूर भेटीवरून राज्यात राजकारण सुरू आहे. दर्शनासाठी या, पण राजकीय हेतू ठेवू नका, असं सत्ताधारी पक्षांनी म्हटलं आहे. तर केसीआर यांच्या पक्षाच्या नेत्याने राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार आणि राष्ट्रवादीवर हल्लाबोल केला आहे. तेलंगणचे मुख्यमंत्री केसीआर आणि त्यांचे मंत्रीमंडळ अन् नेते मंडळी हे सोलापुरात दाखल झाले आहेत. भारत राष्ट्र समितीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष माणिक कदम आणि पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बी. जे. देशमुख यांनी महाराष्ट्र सरकार विरोधात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.**

तेलंगणचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव हे विठ्ठल भक्त आहेत. दर्शनासाठी आले आहेत. त्याबाबत महाराष्ट्र सरकारने राजकारण करू नये, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. बीआरएसचे राज्य प्रमुख माणिक कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवरही तिखट शब्दांत टीका केली आहे. राष्ट्रवादीने शेतकऱ्यांचे गळे दाबले आहेत, म्हणून राष्ट्रवादीमधील काही शेतकरी नेते बीआरएस पक्षात प्रवेश करत आहेत, असे ते म्हणाले.

हिंदूराष्ट्र सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केसीआर आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील नेत्यांना व्हिआयपी दर्शनास विरोध केला आहे. बीआरएस नेते व प्रदेश



अध्यक्ष माणिक कदम यांनी हिंदू राष्ट्र सेनेच्या पदाधिकाऱ्यांना यावरून प्रत्युत्तर दिलं आहे. हजारो किलोमीटरचा प्रवास करून आलेले वारकरी हे दर्शनाचे खरे मानकरी व हकदार आहेत आणि हे आम्हाला मान्य आहे. पण व्हिआयपी दर्शन सर्वांसाठी बंद करा. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांनाही व्हिआयपी दर्शन बंद करा, अशी मागणी बीआरएस नेत्यांनी केली. वारकऱ्यांवर लाठीचार्ज करणारे हेच ते राज्य सरकार आहे, अशी टीकाही त्यांनी केली आहे. महाराष्ट्र राज्य सरकारमधील आणि महाराष्ट्रातील पक्ष स्थापन करणाऱ्या नेत्यांना बीआरएसचे पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख बी. जे. देशमुख यांनी टोला लगावला आहे. तेलंगण राज्य २०१४ मध्ये स्थापन झालं आहे. काही वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या तेलंगणमध्ये कल्याणकारी व शेतकऱ्यांचा हिताचं सरकार स्थापन झाले आहे. तेलंगणमध्ये चीन सारखी प्रगती झाली आहे. पण महाराष्ट्र राज्यात आजही तशी प्रगती झाली नाही, अशी खंत व्यक्त करत राज्य सरकारवर टीका केली आहे.

### फडणवीसांनी शरद पवारांना पुन्हा डिवचलं

मुंबई: राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात ओबीसी नेते हे फक्त नावापुरतेच असल्याच्या देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याला शरद पवार यांनी प्रत्युत्तर दिले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा इतिहास काढून पाहिल्यास ओबीसी नेत्यांकडे प्रदेशाध्यक्षपद असल्याचे सहज लक्षात येईल. पण देवेंद्र फडणवीस यांचे वाचन कमी असावे, असा टोला शरद पवार यांनी लगावला होता. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा शरद पवार यांना डिवचले आहे. मी तर केवळ राष्ट्रवादीच्या नेते दबक्या आवाजात बोलत आहेत, तेच जाहीरपणे अभिव्यक्त केले आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. ते सोमवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला केवळ दाखवण्यापुरता ओबीसी नेते लागतात. कारण, प्रमुख संवैधानिक पद द्यायची वेळ येते तेव्हा राष्ट्रवादीला ओबीसींचा विसर पडतो, ही गोष्ट आतापर्यंत सगळ्यांच्या लक्षात आली आहे. ही गोष्ट मीच म्हणतोय असं नाही, आता त्यांच्याच पक्षातून मागणी आलेय की, ओबीसी प्रदेशाध्यक्ष करा. त्यांच्या पक्षातील नेते दबक्या आवाजात जे बोलतात, तेच मी अभिव्यक्त केलंय. अख्या महाराष्ट्राला माहिती आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा कोणाच्या दबावात चालतो, पक्षात कोणाचा बोलबाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासगीत याबाबत बोलतात. मी ते जाहीरपणे व्यक्त केलं, ही गोष्ट शरद पवार यांना आवडली नसावी, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. आता यावर राष्ट्रवादीच्या गोटातून काय प्रतिक्रिया येणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

---

## अजित पवारांच्या मागणीचं काय होणार? शरद पवारांचं एका वाक्यात उत्तर

। बारामती। महाईन्यूज

'राज्याचे विरोधी पक्षनेते जित पवार यांनी पक्ष संघटनेतील पदाची मागणी केली असली तरीही हा निर्णय मी एकटा घेत नाही. त्यांनी इच्छा व्यक्त केली असेल तर पक्षातील प्रमुख लोक बसून त्यातून निर्णय घेतील,' असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी सोमवारी केले.

'पक्ष संघटनेच्या कामात सर्वांनी लक्ष घालावे अशी प्रत्येकाचीच भावना आहे. तेच मत अजित पवार यांनी पक्षाच्या व्यासपीठावर व्यक्त केले आहे, त्यात यापेक्षा वेगळे काही नाही,' असेही पवार यांनी नमूद केले.

**'पंतप्रधानपदावर चर्चा नाही'**

'पाटण्यातील बैठकीत आगामी पंतप्रधान या विषयी कोणतीही चर्चा झाली नाही. महागाई, बेरोजगारी, सांप्रदायिक शक्ती वाढविण्याचा प्रयत्न होत असल्याबद्दल बैठकीत चर्चा झाली. कोणत्याही राज्यात जाती-धर्मात मतभेद वाढल्यास



ते समाजाच्या दृष्टीने चांगले नाही. सत्ताधारी भाजप तशी पावले टाकत आहे. या सगळ्या गोष्टींना आवर घालण्यासाठी आपण एकत्र आले पाहिजे, हा बैठकीत चर्चेचा विषय होता,' याकडे शरद पवार लक्ष वेधले.

**देवेंद्र फडणवीसांना टोला**

'एकनाथ शिंदे यांनी केली तर बेईमानी व शरद पवारांनी केली तर मुत्सद्देगिरी,' या टीकेवर पवार यांनी 'मी बेईमानी कधी केली हे त्यांनी सांगावे,' असा सवाल केला. 'सन १९७७ साली आम्ही सरकार बनवले. त्यात भाजप माझ्यासोबत होता. त्यामुळे त्यांना कदाचित पूर्वीचा इतिहास माहिती नसेल. मी जे सरकार बनवले ते सगळ्यांना घेऊन केले.

## मुंबईत आज अतिमुसळधार पावसाची शक्यता

### मुंबईसह पालघर, ठाणे जिल्ह्यांनाही ऑरेंज अॅलर्ट

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आगमनाच्या दिवशी मुंबईत पावसाने दमदार हजेरी लावल्यानंतर आज मंगळवारीही मुंबईत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबईसह पालघर, ठाणे जिल्ह्यांनाही मंगळवारी ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला आहे. आगमनाच्या दिवशी मुंबईत पावसाने दमदार हजेरी लावल्यानंतर आज मंगळवारीही मुंबईत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे पहिल्याच पावसात दाणादाण उडाल्यानंतर मंगळवारच्या पावसाबद्दल मुंबईकरांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.**

अल्प कालावधीत तूट भरून काढण्याचा विक्रम यंदाही कायम राहतो का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मुंबईसह पालघर, ठाणे जिल्ह्यांनाही मंगळवारी ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला आहे.

रविवारी सकाळी ८.३० ते सोमवारी सकाळी ८.३० या कालावधीत कुलाबा येथे ६३.६ मिमी, तर सांताक्रूझ येथे २४.६ मिमी पाऊस पडला. दिवसभर उपनगरांमध्ये मध्यम सरींची उपस्थिती होती. सांताक्रूझ येथे सायं. ५.३० पर्यंत २७ मिमी पाऊस पडला, तर कुलाबा येथे शून्य मिमी पावसाची नोंद झाली. सोमवारी दिवसभरात प्रामुख्याने कल्याण, डोंबिवली, ठाणे, नवी मुंबई या पट्ट्यामध्ये पाऊस होता. गोरेगाव, अंधेरी या भागांमध्येही पाऊस पडला. सकाळी ७ पासून सायं. ७ पर्यंतच्या १२ तासांमध्ये या भागांमध्ये २० ते ४० मिमीदरम्यान पाऊस नोंदला गेला. मंगळवारी मात्र कोकण पट्ट्यामध्ये रत्नागिरी, रायगड ते पालघरपर्यंत पावसाचा जोर वाढून काही ठिकाणी मुसळधार ते अती मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. बुधवारी पालघर आणि रायगड जिल्ह्याला ऑरेंज अॅलर्टचा इशारा कायम आहे. तर उर्वरित कोकणात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकेल.



### पावसाची तूट 70 टक्के

**राज्यात मान्सून सक्रिय झाल्यापासून सोमवार सकाळपर्यंत ७० टक्के पावसाची तूट नोंदली गेली आहे. आत्तापर्यंत १७०.८ मिमी सरासरी पाऊस राज्यात नोंदला जातो, हा पाऊस आत्तापर्यंत केवळ ५१.१ मिमी एवढाच नोंदला गेला आहे. ऑरेंज अॅलर्ट दिलेल्या जिल्ह्यांपैकी मुंबई शहरात ६६ टक्के, उपनगरात ४२ टक्के, ठाणे जिल्ह्यात ६३ टक्के, पालघर येथे ४६ टक्के, रायगड येथे ५६ टक्के आणि रत्नागिरी येथे ७० टक्के पावसाची तूट आहे.**

# “घरातून लव्ह मॅरेजला...”

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री रेश्मा शिंदेने अल्पावधीतच कलाविश्वात स्वत:ची ओळख निर्माण केली. रेश्मा सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. रेश्मा अनेक फोटो व व्हिडीओ तिच्या सोशल मीडियावर शेअर करत असते. सध्या रेश्माने केलेल्या पोस्टमुळे ती चर्चेत आहे.

रेश्माने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन मुंडावळ्या बांधलेला एक फोटो शेअर केला आहे. या फोटोला दिलेल्या कॅप्शनने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. रेश्माने या फोटोला “जेव्हा घरातून लव्ह मॅरेजला परमिशन मिळते, तेव्हा नवरी सासरी जाताना”, असं कॅप्शन दिलं आहे. तिची ही पोस्ट सध्या चर्चेत आहे.

रेश्मा सध्या ‘रंग माझा वेगळा’ या मालिकेत दीपाची भूमिका साकारत आहे. ही मालिका सध्या रंजक वळणावर असून दीपा व कार्तिकचा विवाहसोहळा मालिकेत पाहायला मिळत आहे. त्याच दरम्यानचा हा मालिकेतील फोटो रेश्माने पोस्ट केला आहे.



२०१४ साली ‘लगोरी’ या मालिकेतून छोट्या पडद्यावर पदार्पण केलेल्या रेश्माने अभिनयाची छाप प्रेक्षकांवर पाडली. तिने अनेक मालिकांसह चित्रपटांतही काम केलं आहे.

# ‘आदिपुरुष’च्या निर्मात्यांना उच्च न्यायालयाने फटकारलं

आदिपुरुष सिनेमा रिलिज होऊन दहा दिवस होऊन गेले आहेत. मात्र या सिनेमातल्या कलाकरांच्या संवादांवरुन आणि पोशाखांवरुन सुरु झालेला वाद हा काही शमण्याचं नाव घेताना दिसत नाही. या सिनेमातले काही संवाद बदलण्यातही आले आहेत. मात्र प्रेक्षकांचं हे म्हणणं आहे की रामायणासारख्या धर्मग्रंथाचा हा अपमान आहे. या सिनेमाच्या विरोधात वकील कुलदीप तिवारी यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठात याचिका दाखल केली होती. याविषयीची सुनावणी आज झाली त्यात कोर्टाने आदिपुरुषच्या निर्मात्यांना फटकारलं आहे.



**काय म्हटलं आहे कोर्टाने?**

आदिपुरुषच्या विरोधात जी याचिका दाखल करण्यात आली होती त्याविषयी न्यायमूर्ती राजेश सिंह चौहान आणि न्यायमूर्ती श्रीप्रकाश सिंह यांच्या डिव्हिजन बेंचने सुनावणी केली. वरिष्ठ वकील रंजना अग्निहोत्री यांनी बाजू मांडत सिनेमातले आक्षेपार्ह संवाद आणि चुकीचे प्रसंग याबाबत न्यायालयाला माहिती दिली. २२ जून रोजी याविषयीची याचिका दाखल करण्यात आली होती. यानंतर कोर्टाने वकील अश्विनी सिंह यांना विचारलं की सेन्सॉर बोर्ड काय करतं आहे?

सिनेमा हा समाजाचा आरसा आहे असं म्हटलं जातं. येणाऱ्या पिढ्यांना तुम्ही काय शिकवणार आहात? सेन्सॉर बोर्डाला त्यांची जबाबदारी समजत नाही का? कोर्टाने हे देखील म्हटलं आहे की रामायण, कुराण, गुरु ग्रंथसाहेब, भगवद्गीता यांसारख्या धार्मिक ग्रंथांना तरी सोडा.

कोर्टाने आज आदिपुरुष या सिनेमाचे निर्माते, दिग्दर्शक आणि अन्य प्रतिवादी हे कोर्टात उपस्थित का नाहीत? असाही प्रश्न उपस्थित केला. रंजना अग्निहोत्रींनी कोर्टाला हेदेखील सांगितलं की अद्याप याविषयीचं उत्तर सेन्सॉर बोर्डानेही दिलेलं नाही. तसंच सिनेमात रावण वटवाघुळाला मांस खाऊ घालताना दाखवला आहे, सीतेला स्लीव्हलेस ब्लाऊजमध्ये दाखवलं गेलं आहे, वटवाघुळ म्हणजेच रावणाचं विमान दाखवलं आहे, काळ्या रंगाची लंका, सुषेण वैद्याचा उल्लेख न करणं, बिभीषणाच्या पत्नीने लक्ष्मणाला संजीवनी देणं अशा आक्षेपार्ह प्रसंगांवरही आक्षेप घेतला आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी आता २७ जून रोजी होणार आहे.

# आगामी चित्रपट ‘बडे मियाँ छोटे मियाँ’च्या शूटिंगची मुंबईत झाली सुरुवात



आगामी ॲक्शन एंटरटेनर चित्रपट ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ची घोषणा झाल्यापासून याची चर्चा सर्वत्र आहे. या चित्रपटात बॉलीवूडचे दोन सर्वात मोठे ॲक्शन हिरो, अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ यांना एकत्र पाहायला मिळणार असून, हे कॉम्बिनेशन प्रेक्षकांना नक्कीच आवडेल. तसेच, पृथ्वीराज सुकुमारन देखील या सिनेमाद्वारा खलनायकाच्या व्यक्तिरेखेतून आपले अभिनय कौशल्य दाखवत दर्शकांच्या भेटीला येणार आहेत. अली अब्बास जफरद्वारा दिग्दर्शित होणाऱ्या या चित्रपटात, पूर्वी कधीही न पाहिलेले ॲक्शन सेट, जगभरातील क्रू, विशेष टेक्नोलॉजी आणि उपकरणे यांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. अशातच, अनेक महिन्यांच्या कठोर तयारीनंतर, ‘बीएमसीएम’च्या निर्मात्यांनी सर्व कलाकार, क्रू आणि सिनेसृष्टीतील शुभचिंतकांसह चित्रपटाच्या शूटिंगची शुभ मुहूर्तावर सुरुवात केली. वाशू भगनानी यांनी इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत चित्रपटाच्या मुहूर्त शॉटबद्दलचा उत्साह व्यक्त केला. वाशू भगनानी, दीपशिखा देशमुख, जॅकी भगनानी, हिमांशू किशन मेहरा आणि अली अब्बास जफरद्वारा प्रोड्युस्ड, वाशू भगनानी आणि पूजा एंटरटेनमेंटद्वारा प्रस्तुत आणि अली अब्बास जफरद्वारा लिखित आणि दिग्दर्शित तसेच, एएझेड फिल्मच्या सहयोगाने पूजा एंटरटेनमेंटचा ॲक्शन एंटरटेनर ‘बड़े मियां छोटे मियां’हा चित्रपट डिसेंबर 2023 मध्ये सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

# राखी नरमली, तुरुंगात जायला घाबरली

राखी सावंतला मुंबई हायकोर्टातुन अटकेसाठी तूर्तास दिलासा मिळाला आहे. मॉडेल आणि अभिनेत्री शर्लिन चोप्राने केलेल्या तक्रारीवरून मुंबई पोलिसांनी राखीला ताब्यात घेतले होते.

पुढे राखीने अटक होण्यापासून सुटका व्हावी म्हणून मुंबई हायकोर्टात जामिनासाठी अपील केलं आहे. राखीला तुर्तास हायकोर्टाकडून दिलासा मिळाला असून मंगळवारपर्यंत राखीला कोणतीही अटक होणार नाही, असा आदेश हायकोर्टाने दिलाय


राखी सावंतला मॉडेलचा शर्लिन चोप्राचे फोटो व्हायरल केल्या प्रकरणी आंबोली पोलिसांनी अटक केली होती. काही तास चौकशी करून मुंबई पोलिसांनी राखीची सुटका केली. परंतु हीच गोष्ट पुन्हा घडू नये म्हणून राखीने मुंबई हायकोर्टात जामिनासाठी अर्ज दाखल केलेला.

पुढे मुंबई हायकोर्टाने राखीचा जामीन नाकारणं हे बेकायदेशीर आहे असा निर्णय देत मुंबई पोलिसांना फटकारले. त्यामुळे आज मंगळवारपर्यंत राखीला अटक होणार नाही, असा आदेश देऊन सध्या तरी अटकेपासून राखीला तूर्तास दिलासा मिळालाय.

शर्लिन चोप्राच्या तक्रारीवरून राखी सावंतविरुद्ध आयपीसी आणि आयटी कायद्याच्या विविध कलमांतर्गत एफआयआर दाखल करण्यात आल्याचे मुंबई पोलिसांनी म्हटले आहे. तिने पत्रकार परिषदेदरम्यान चोप्राचा आक्षेपार्ह व्हिडिओ दाखवला आणि आक्षेपार्ह भाषा वापरली, असा आरोप तक्रारकर्त्याने केला आहे.

गेल्या वर्षी राखीने पोलिसांना सांगितले की, शर्लिन चोप्राने 6 नोव्हेंबर 2022 रोजी यूट्यूब आणि इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ अपलोड केला होता, ज्यामध्ये तिने तिच्याविरुद्ध आक्षेपार्ह टिप्पणी केली होती आणि असभ्य भाषा वापरली होती.

दरम्यान राखीने तिच्या फोनमधून शर्लिन चोप्राचे आक्षेपार्ह व्हिडिओ डिलीट केलेत, असा दावा राखीच्या वकिलांनी केलाय. आता राखीला अटक होणार कि मुंबई हायकोर्ट राखीचा जामीन निश्चित करणार, याची सर्वांना उत्सुकता आहे.



# नेदरलँड्सचा वेस्ट इंडिजवर ‘सुपर’ विजय!

## विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या मुख्य फेरी प्रवेशासाठी पात्रता फेरीत केला पराभव

। हरारे ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या मुख्य फेरी प्रवेशासाठी सध्या सुरु असलेल्या पात्रता फेरीत सोमवारी नेदरलँड्सने ‘सुपर ओव्हर’ मध्ये वेस्ट इंडिजचा पराभव केला. या वर्षी भारतात होणाऱ्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या मुख्य फेरी प्रवेशासाठी सध्या सुरु असलेल्या पात्रता फेरीत सोमवारी नेदरलँड्सने ‘सुपर ओव्हर’ मध्ये वेस्ट इंडिजचा पराभव केला.**



संपूर्ण सामन्यात तब्बल ७४८ धावांचा पाऊस पडला. वेस्ट इंडिजने निकोलस पूरनच्या (नाबाद १०४) शतकी खेळीच्या जोरावर ६ बाद ३७४ धावा केल्या. त्याला किंगची (७६) साथ मिळाली. त्यानंतर आव्हानाचा पाठलाग करताना निदामानुरुच्या (१११) फटकेबाजीच्या जोरावर नेदरलँड्सने ९ बाद ३७४ धावा केल्या. सामना बरोबरीत सुटल्यामुळे घेण्यात आलेल्या एका षटकाच्या खेळात नेदरलँड्सने बाजी मारली. या पराभवाने दोन वेळच्या विजेत्या वेस्ट इंडिजच्या मुख्य स्पर्धेत खेळण्याचा आशा अंधुक झाल्या आहेत. यापूर्वी त्यांना झिम्बाब्वेने देखील पराभूत केले आहे. सुपर ओव्हरच्या एका षटकांत व्हॅन बीकने सहा चेंडूंत (४,६,४,६,६,४) तीस धावा फटकावून काढल्या. हे आव्हान वेस्ट इंडिजला पेलवले नाही. वेस्ट इंडिजने दोन फलंदाज गमावून केवळ ८ धावा केल्या.

व्हॅन बीकच्या या तुफानापूर्वी ३७५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना तेजा निदामानुरु आणि कर्णधार स्कॉट एडवर्डसने पाचव्या विकेटसाठी १४३ धावांची भागीदारी करून नेदरलँड्सला विजयाच्या आशा दाखवल्या होत्या. या दोघांनी अवघ्या ९० चेंडूंत ही भागीदारी केली. मात्र, त्यानंतर नेदरलँड्सने घाईत १४ धावांत ३ गडी गमावले आणि अखेरच्या दोन षटकांत ३० धावा असे समीकरण राहिले. त्या वेळी खेळपट्टीवर असणाऱ्या बीकने ४९व्या षटकातील पहिल्या तीन चेंडूंत १४ धावा घेतल्या. अखेरच्या षटकांत नेदरलॅण्डसला ६ षटकांत ९ धावांची आवश्यकता होती. मात्र, शेवटच्या चेंडूंवर विजयासाठी १ धाव आवश्यक असताना बीक (१४ चेंडूंत २८) बाद झाल्याने सामना बरोबरीत सुटला.

### पूरनची 65 चेंडूंत 104 धावांची खेळी

प्रथम फलंदाजी करताना ब्रेंडन किंग (८१ चेंडूंत ७६) आणि जॉन्सन चार्ल्स (५५ चेंडूंत ५४) यांच्या १०१ धावांच्या सलामीनंतर निकोलस पूरनच्या फटकेबाजीने वेस्ट इंडिजचे आव्हान उभे राहिले होते. पूरनने ६५ चेंडूंत १०४ धावांची खेळी करताना ९ चौकार आणि ६ षटकारांची आतषबाजी केली.

# धोनीचा असाही फॅन, चक्क स्वतःच्या रक्ताने लिहिले पत्र

## आय लव्ह यू म्हणत बर्थडे आधीच केली मागणी

। भिलवाडा।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

महेंद्रसिंग धोनीचे चाहते जगाच्या कानाकोपऱ्यात आहेत. धोनीला फक्त खेळताना त्याची एक झलक पाहण्यासाठी लोक अगदी काहीही करण्यासाठी तयार होतात. धोनीचे चाहते त्याच्यावर मनापासून प्रेम करतात. धोनी आता फक्त चेन्नई सुपर किंग्जकडून आयपीएल खेळतो.

सामन्यादरम्यान स्टेडियममध्ये उपस्थित प्रेक्षक त्याच्या नावाची जर्सी घालून त्याला पाठिंबा देण्यासाठी पोहोचतात. त्याच्या एका झलकसाठी चाहत्यांनी अनेकवेळा रस्ते अडवले आहेत. आता धोनीच्या अशाच एका चाहत्यांना त्याला रक्ताने दिलेले पत्र दिले आहे. राजस्थानमधील भिलवाडा येथील धोनीच्या चाहत्याने तर कहरच केला. जिल्ह्यातील शाहपुरा येथील रहिवासी असलेल्या विजेश कुमारने माहीला स्वतःच्या रक्ताने लिहिलेले निमंत्रण पत्र पाठवले आहे.



### काय लिहिले पत्रात?; तुला यावेच लागेल

निमंत्रण पत्राच्या मागे विजेश कुमारने रक्ताने आणखी सुंदर संदेश लिहून आपली उत्कटता व्यक्त केली आहे. धोनीचे चाहते विजेश कुमार यांनी सांगितले की एकूण ५ ठिकाणी ५ सामने आयोजित केले जातील आणि त्यात १२ संघ सहभागी होतील, ज्यासाठी १ जुलैपर्यंत नोंदणी केली जाईल. स्पर्धेतील विजेत्या संघाला ३१ हजार रुपयाचे रोख पारितोषिक आणि उपविजेत्या संघाला १६ हजार रुपयाचे रोख पारितोषिक दिले जाईल. एखाद्या क्रिकेटपटूच्या चाहत्याने वाढदिवसानिमित्त आयोजित केलेला हा

### पत्र धोनीपर्यंत पोहोचेल का?

क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनीच्या वाढदिवसानिमित्त ७ जुलै रोजी होणाऱ्या या स्पर्धेचे पोस्टर बालाजी मंदिर, शाहपुराचे महंत रामदास महाराज यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले आहे. आता क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनी त्याच्या चाहत्याच्या रक्ताने लिहिलेले निमंत्रण पत्र मिळाल्यावर काय प्रतिक्रिया देतो हे पाहावे लागेल.

# भारतीय संघासाठी गुड न्यूज:

## जसप्रीत बुमराह कमबॅक करणार

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आयर्लंडविरुद्धच्या मालिकेपासून भारतीय क्रिकेट संघात परतण्याची शक्यता आहे. या टी-२० मालिकेसाठी त्याची निवड करून त्याची तंदुरुस्त चाचणी होण्याची शक्यता आहे. एका वर्षापासून भारतीय क्रिकेट संघाबाहेर असलेला बुमराह वर्ल्ड कप स्पर्धेच्यावेळी पूर्ण बहरात असावा ही भारतीय संघाची अपेक्षा आहे.**




भारतीय क्रिकेट बोर्डाच्या निवड समितीने वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी आणि वन-डे मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली; मात्र त्याचवेळी टी-२० संघांची निवड लांबवली आहे. ही मालिका २ ते १३ ऑगस्टदरम्यान होणार आहे. या मालिकेसाठी बुमराहला खेळवण्याचा विचार सुरू आहे; मात्र त्यांच्या संघसमावेशाची घाई न करता आयर्लंडविरुद्धची मालिका पुनरागमनासाठी योग्य ठरेल, या मतास जास्त पुष्टी मिळत आहे. वर्ल्ड कप क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघव्यवस्थापनास बुमराह आवश्यक आहे. त्यादृष्टीनेच प्रयत्न सुरू आहेत. त्यापूर्वी तो आशिया कप स्पर्धेत खेळल्यासही ते संघासाठी उपयुक्त ठरणार आहे; मात्र थेट वन-डे लढतीत खेळवण्यापूर्वी चार षटकांची मर्यादा असलेल्या टी-२० मध्ये खेळणे बुमराहसाठी उपयुक्त ठरेल, असे वैद्यकीय समितीचे मत आहे.

गतवर्षीच्या सप्टेंबरपासून बुमराह भारतीय संघाबाहेर आहे. त्याच्या पाठीवर शस्त्रक्रियाही करण्यात आली. बेंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत त्याच्यावर पुनर्वसन प्रक्रिया सुरू आहे. तो सध्या ७० टक्के तंदुरुस्त आहे. त्यामुळे दोन महिन्यांनी होणाऱ्या आयर्लंडविरुद्धच्या मालिकेत तो खेळू शकेल, असा विश्वास भारतीय संघव्यवस्थापनास आहे. आयर्लंडविरुद्धच्या मालिकेतील लढती १८, २० आणि २३ ऑगस्टला होणार आहेत. बुमराहची सामना तंदुरुस्ती जाणून घेण्यासाठी पुढील महिन्यात राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत काही सराव सामने घेण्यात येतील. या सामन्यांनंतर त्याच्या तंदुरुस्तीचा आढावा घेण्यात येईल. त्यानंतरच त्याच्या भारतीय संघातील निवडीबाबत विचार होईल. राहुलवरील पुनर्वसन प्रक्रिया सुरू लोकेश राहुल राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत दाखल झाला आहे. त्याच्यावर मे महिन्यात शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्याच्यावरील पुनर्वसन प्रक्रिया सुरू झाली आहे.